ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# महात्मा ज्योतिष फूले यांचे स्त्रियांविषयक विचार



**प्रा. श्रीरंग शामराव लोखंडे**
**राज्यशास्त्र विभाग,**
**यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.**

## प्रास्ताविक

म. फले जातीभेद, चातर्वर्ण्य यांच्या विरोधात होते. काही अपवाद वगळता स्त्रियांचे कार्यक्षेत्र 'चूल व तत्कालीन समाजव्यवस्थेला हे मान्य नव्हते. त्यामळे फल्यांचे मूल' एवढेच सीमित होते. स्त्रीला 'गृहदेवता', पतीची अर्धांगिनी बंड हे ऐतिहासिक ठरले. चातुर्वर्ण्य व्यवस्था, समाजातील मानले जात होते पण शिक्षणाचा अधिकार नव्हता. जातीपातीचे प्रस्थ त्यांना मान्य नव्हते. ब्राह्मणांकडे शिक्षणाची. समाजात बाला-जरठ विवाहाची पद्धत रूढ होती. ज्ञानाची व नेतृत्वाची मक्तेदारी देऊन स्त्री-शूद्रांना हीन अवस्था बाला-जरठ विवाहात मुलगी ६-७ वर्षांची व नवरदेव ६०व लाचारी समाजाने दिली. या सर्वांविरुद्ध फलेंनी बंड केले.

म. ज्योतिबा फुले यांनी आपले आयुष्य व समाजसुधारणेकरिता घालविले. त्यांच्या या कार्याबद्दल मुंबई त्यांना पाहिल्यावर अपशकून मानला जाई. तिने केशवपन शहरात मांडवी कोळीवाड्यात सन १८८८ मधे एक जाहीर सभा घेण्यात आली. या सभेत मुंबईकरांनी फलेंचा घालणे यांस परवानगी नव्हती. तरूण वयात तिचे वाकडे सन्मान करून त्यांना 'महात्मा' ही पदवी दिली. महात्मा ज्योतिबा पाऊल पडले तर समाजाकडून तिला शिक्षा केली जाई. अशा फुले व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी स्त्री-शिक्षण व परिस्थितीत फुल्यांनी स्त्री व पुरुष या दोहोंनाही समान लेखून स्त्री-सुधारणेचे खूप मोठे कार्य केले.

महात्मा फुले समाजसुधारक कसे झाले याची एक त्यासाठी लढा दिला. हकीकत वाचनांत आली. त्यांच्या ब्राह्मण मित्राच्या लग्नांत ते ब्राह्मण व-हाड्यांनी त्यांचा अपमान केला. त्यामुळे ते लगातून तडक घरी परत गेले. या अपमानाने ते स्त्रिया शिकल्यास त्या विधवा होतात असा समज होता. म. व्यथित झाले. यानंतर ते समाज सुधारणेकडे जास्त प्रमाणात फुले यांना मात्र स्त्री ही पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे असे वाटत होते. ओढले गेले.

## संशोधनाची उद्दिष्टे –

या शोधनिबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. म. ज्योतिबा फुलेंच्या काळच्या स्त्रियांच्या स्थितीचा आढावा घेणे.

२. ही स्त्रियांची स्थिती पालटण्यासाठी ज्योतिबा फुलेंचे प्रयत्न अभ्यासणे.

३. त्यांनी स्त्रीशिक्षणासाठी केलेले प्रयत्न पाहणे.

४. महात्मा फुलेंनी स्त्रियांबाबतच्या इतर कुप्रथांना केलेला विरोध अभ्यासणे.

## संशोधनाची मर्यादा –

या शोधनिबंधात म. फुल्यांच्या स्त्री विषयक कार्याचा अभ्यास आला आहे. त्यामुळे त्यांच्या इतर कार्याचा, शूद्रातिशूद्रांच्या संबंधी चळवळींचा उल्लेख या शोधनिबंधांत केलेला नाही.

## म. फुलेंच्या काळातील स्त्रियांची स्थिती –

मध्ययुगीन काळांत समाजाचे जीवन कुंठीत झाल्यासारखे होते. त्यातून स्त्रियांची स्थिती तर शोचनीय होती. सुधारणांना अजून सुरूवात झालेली नव्हती. समाजात स्त्रियांना कनिष्ठ दर्जा होता. काही अपवाद वगळता स्त्रियांची कार्यक्षेत्र ' चूल व मुल' एवढेच सीमित होते. स्त्रीला 'गृहदेवता' , पतीची शिक्षणाचा अधिकार नव्हता.

समाजात बाला-जरठ पद्धत रूढ होती. बाला-जरठ विवाहाची पद्धत रूढ होती. मुलगी ६-७ वर्षाची नवरदेव ६०-७० वर्षेचा असायचा. त्या स्त्रिया पतीच्या निधनानंतर तरुण वयातच विधवा होत. अशा विधवांवर अनेक बंधने होती. त्यांना पाहिल्यावर अपशकुन मानला जाई. तिने केशवपन करणे आवश्यक होते. त्यांना चांगले कपडे घालणे, दागिने घालणे यास परवानगी नव्हती. तरुण वयात तिचे वाकडे पाऊल पडले तर समाजाकडून तिला शिक्षा दिली जाई. अशा परिस्थितीत फुल्यांनी स्त्री-पुरुष या दोहोनाही समान लेखून स्त्रियांच्या शिक्षणाचा , त्यांचा अधिकाराचा पुरस्कार केला. त्यासाठी लढा दिला.

**१ स्त्री शिक्षणाची सुरुवात -** स्त्रियांची परिस्थिती सुधारायची असेल तर त्यांना शिक्षण दिले पाहिजे पण समाजात स्त्रिया शिकल्यास त्या वेगळ्या होतात असा समज होता महात्मा फुले यांनी यांना मातो श्री ही पोशापेक्षा श्रेष्ठ आहे असे वाटत होते रात्रंदिवस नऊ महिने मुलाला पोचणारी जन्म देणारे मूलमूत्र काढून लहान पालन करणारे जन्मदात्री स्त्री फुलांना श्रेष्ठ या स्त्रीची परिस्थिती सुधारण्यासाठी स्त्रियाला शिकवले पाहिजे महात्मा फुलेंनी यासाठी १८४८ मध्ये पुणे येथे बुधवार पेठेत तात्यासाहेब भिडे यांच्या वयात मुलींची पहिली शाळा सुरू केली या शाळेत त्यांनी सुद्रांची स्त्रियांना शूद्र यांच्या स्त्रियांना शिक्षण देण्यास सुरुवात केली महात्मा फुलेंनी शुद्ध सुद्रातील शुद्राच्या स्त्रियांना शिक्षण देण्यास सुरुवात केलेली ही देशातील पहिली शाळा ठरली पुन्हा ओझर वर इंग्रजी दैनिक २१ ऑगस्ट १८५२ च्या अंकात याचा उल्लेख केला. "जोतीबा गोविंद फुले यांनी असेच स्त्रियांनी केलेले पुरुषांना चालेल का? म्हणून वेताळ पेठेत दोन शाळा काढल्या आहेत. महारमांग, धेडचांभार बहुपत्नीत्वाला त्यांनी विरोध केला. यांच्या मुलींसाठी एक व दुसरी त्याच जातीच्या मुलांसाठी. या ४. बाला-जरठ विवाह - त्या काळात बालादोन्ही शाळांत जोती स्वत:च शिकवतात व या शाळांची जरठ विवाहाची पद्धती होती. ७-८ वर्षांच्या मुलीचे ७० व्यवस्था करतात. ब्राह्मण शिक्षक त्यांना साह्य करीत आहेत." वर्षांच्या वृद्धाशीही लग्न लावून दिले जाई. त्यामुळे विधवांची या शाळांचा खर्च फले स्वतः करतात व २५ रू. महिना साह्य संख्या वाढत असे. या विधवांची स्थिती अतिशय दयनीय दक्षिणा पारितोषिक समितीकडून येते असाही उल्लेख धनंजय असे. त्यांच्यावर केशवपनासह विविध निबंध असत. तरूण कीर फुल्यांच्या चरित्रांत करतात. त्यांच्या या कार्याबद्दल वयांत त्यांचे पाऊल वाकडे पडल्यास समाज त्यांना मोठी ब्रिटिश शासनाने २०० रू. व शालजोडी

देऊन त्यांचा गौरव शिक्षा करी किंवा त्यांना जीव देण्यावाचून पर्याय नव्हता. यास केल्याचाही उल्लेख धनंजय कीर यांनी लिहिलेल्या फुले चरित्रांत फुल्यांनी तीव्र विरोध दाखवला. आढळतो.[४]

**२. बालविवाह विरोध -** त्या काळात बालविवाहाची रूढ होती. बालविवाहात पाळण्याला पाळण्याला मुंडावळ्या बांधण्यापासून १२-१३ वर्षापर्यंत मुला-मुलींचे वय विवाह होत. फुल्याच्या विवाहात सावित्रीबाईचे वय ८ तर त्यांचे स्वतःचे १३ वर्षे होते. बालविवाहामुळेहीबालविधवाची समस्या निर्माण होई कारण विधूर पुरुष पुन्हा विवाह करू शकत असे पण एकदा स्त्री विधवा झाली की स्त्रीला दुसरा विवाह करता येत नसे. त्यातूनच अनेक समस्या निर्माण होत. याला विरोध करताना पुढे म्हणतात, सरकारी कायद्याच्या बडगा उगारला गेला नाही तर ही परिस्थिती बदलणार नाही. कायद्याने मुलींचे विवाहाचे ११ वर्ष व मुलांचे १९ वर्ष करावे.

**३. बहुपत्नीत्वास विरोध -** त्या काळात एक पुरुष आणि स्त्रियांशी विवाह करू शकत असे. परंतु फुले यांना स्त्री व पुरुष समान आहेत असे वाटत असे. आपल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' मधे फुले म्हणतात, आपण सर्वांच्या निर्माणकर्त्याने , एकंदर सर्व स्त्री-पुरुषास, एकंदर सर्व मानवी अधिकाऱ्यांचे मुख्य धनी केले आहे. त्यातून एखादा मानव अथवा काही मानवांची टोळी एखाद्या व्यक्तीवर जबर करू शकत नाही. व त्याप्रमाणे जबर न करणाऱ्या सत्यवर्तन म्हणतात. स्त्री पुरुष समतेवर त्यांचा विश्वास होता. त्यांना स्वतःला अपत्य नसल्याने त्यांच्या आई-वडिलांनी त्यांना आपत्य प्राप्तीसाठी दुसरा विवाह कारण्याचा आग्रह केला असता त्याने तो नाकारला. अमुक पुरुषापासून अपत्य होत नाही म्हणून स्त्रीने दुसरा विवाह केल्यास पुरुषास आवडेल का? असा युक्तीवाद ते येथे देतात. काही पुरुष पहिली पत्नी असतानाही ३-४ विवाह करीत.याबाबतीत फुले म्हणतात असेच स्त्रियानी केलेले पुरुषांना चालेल का? म्हणून बहुपत्नीत्वाला त्यांनी विरोध केला.

**४. बाला – जरठ विवाह -** त्या बाला – जरठ विवाहाची पद्धती होती. ७-८ वर्षाच्या मुलींचे ७० वर्षाच्या वृधाशीही लग्न लावून दिले जाई. त्यामुळे विधवांची संख्या वाढत असे. या विधवांची स्थिती अतिशय दयनीय असे. त्यांच्यावर केशवपनासह विविध निर्बंध असत. तरुण वयात त्यांचे पाऊल वाकडे पडल्यास समाज त्यांना मोठी शिक्षा करी किंवा त्यांना जीव देणे वाचून पर्याय नव्हता. याच फुलांनी तीव्र विरोध दाखवला.

**५. विधवा विवाहाचा पुरस्कार -** तरुण स्त्रिया विधवा झाल्यास घरी-दारी त्यांचे जिणे मुश्किल होत असे. तिने मरेपर्यंत संन्यासवृतीने राहावे व परमार्थ करावा अशी अपेक्षा समाज करीत असे. पण त्याचवेळाला पुरुषांना एकाचवेळी अनेक लग्न करण्याची किंवा म्हाताऱ्यांनाही तरुण मुलींशी विवाह करण्याची परवानगी होती. या विधवा स्त्रियांकडे समाजाचे पुरुष पुरुष वाईट नजरेने पाहत असत. पण याचा दोष विधवेलाच दिला जाई. महात्मा फुलेंनी त्याची तीव्र चीड होती. हे रोखण्यासाठी त्यांनी विधवांच्या पुनर्विवाहाची चळवळ सुरू केली. 8 मार्च 1864 रोजी पुण्यात त्यांनी 18 वर्ष वयाच्या विधवेचा पुनर्विवाह होता.फुले व त्यांचे जातीतील विधुराशी करून दिला. हा पहिला पुनर्विवाह होता. फुले व त्यांचे मित्र विष्णुशास्त्री पंडित यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन विधवा विवाहाच्या कार्यास पाहून पाहून घेतले

**६. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना -** जरी फुल्यानी विधवा विवाहाचा पुरस्कार केला तरी त्या काळाचा समाज पाहता सर्व विधवांचा पुनर्विवाह शक्य नव्हता. या तरुण विधवा गरोदर राहत व आत्महत्या करीत किंवा जन्माला आलेल्या बालकाची हत्या करीत. १८६३ मध्ये फुल्यानी अशा विधवांच्या प्रसूतीसाठी व त्यांची बालके सांभाळण्यासाठी? बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. तेथे सावित्रीबाई व महात्मा फुले पुणे आणि त्यांची सेवा करण्याचे कार्य केले. त्याच सुधारगृहात काशीबाई नावाच्या ब्राह्मण स्त्रीने एका मुलाला जन्म

दिला. फुले स्वतः आपत्यहीन होते. त्यांनी या मुलाला स्वतःचा मुलगा म्हणून दत्तक घेतले. यशवंत फुले हे त्यांचे चिरंजीव होते.

## निष्कर्ष

भारतातील परंपरागत समाजसंस्थाविरुद्ध बंद करणारे हिले पुरुष म्हणजे बंगालमध्ये राजाराम राम रॉय व महाराष्ट्र महात्मा ज्योतिबा फुले होते. भारतातील मध्यवर्गातील बंदिस्त परंपरावादी समाज संस्थामुळे महात्मा फुलांना त्यांच्याविरुद्धच्या बंडाची प्रेरणा मिळाली.

म. जोतिबा फुले केवळ विचारवंत नव्हते तर 'कर्ते सुधारक' होते. त्यांच्या विचारांचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांनी स्वतः कृती केल्या. समाजसुधारणांच्या चळवळी केल्या. स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र यांच्यासाठी त्यांनी प्रामुख्याने कार्य केले. ते स्वतः स्त्री-पुरुष समानतेचे पुरस्कर्ते होते. त्यामुळे समाजातील स्त्रियांची शोचनीय अवस्था त्यांना पाहवली नाही. ही अवस्था बदलण्याचे त्यांनी प्रयत्न केले. त्यांतूनच त्यांच्या स्त्रीविषयक चळवळी उभ्या राहिल्या.

स्त्रीच्या अवनतीचे मोठे कारण शिक्षणाचा अभाव असल्याचे त्यांच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी पुण्यांत स्त्रियांसाठी शाळा सुरू केली. या शाळेत स्वतः त्यांची पत्नी सावित्रीबाई यांनीही अध्यापन केले.

स्त्रियांच्या अवनतीचे दुसरे कारण विवाहविषयक होते. ते जाणून त्यांनी बालविवाहाला विरोध केला. समाजातील बाला-जरठ विवाहाला विरोध केला. समाजात त्या काळांत मोठ्या प्रमाणांत विधवांची संख्या होती. या विधवांचे जगणे नरकमय होते. त्यातून त्यांची सुटका करण्यासाठी विधवांच्या पुनर्विवाहाची चळवळ सुरू केली. विधवांच्या अनैतिक संबंधातून जन्म पावलेल्या बालकांना व विधवांच्या प्रसूतीकरिता बालहत्या . प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. या बालहत्या प्रतिबंधक गृहात स्वतः जोतिबा फुले व सावित्रीबाई सेवा करीत असत. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर या गृहातील मुलाला स्वतः दत्तकही घेतले

ज्या काळांत जोतिरावांनी हे कार्य केले त्याची कल्पना येण्याकरिता श्री. धनंजय कीर यांनी त्या काळाचे केलेले वर्णन बोलके आहे. "स्त्रियांच्या हक्कांसाठी, उद्धारासाठी त्याग करणाऱ्या आणि कष्ट भोगणाऱ्या जोतीरावांचा 'स्त्रियांचा उद्धारकर्ता' म्हणून सत्कार झाला त्यावेळी न्या. माहादेवराव रानडे हे दहा वर्षांचे होते. ..... विष्णूशास्त्री चिपळूणकर हे दोन वर्षांचे होते. सामाजिक चळवळीचे कैवारी गोपाळ गणेश आगरकर, स्त्रियांच्या विद्यापीठाचे संस्थापक धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई आणि महात्मा गांधी तेंव्हा जन्मालाही आले नव्हते."९

कठीण संज्ञाचे अर्थ –

जरठ – वृद्ध

बहुपत्नीत्व - अनेक स्त्रियांशी विवाह करणे

## संदर्भ –

१. भागवत विद्युत, स्त्रीमुक्तीचे प्रवक्ते, पृ. १५७, नरके हरि, (संपादक), महात्मा फुलेः शोधाच्या नव्या वाटा, १ली आवृत्ती, म. जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, १९९८.

२. कठारे अनिल, फुले, शाहू, आंबेडकर पृ. १३, पूनम प्रकाशन, नांदेड, २०११

३. कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले, पृ. ७६, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती, १९९२.

४. पूर्वोक्त, पृ. क्र. ४९,५१.

५. कठारे अनिल ; फुले, शाहू, आंबेडकर, पृ. १७.
६. भागवत विद्युत ; स्त्री मुक्तीचे प्रवक्ते, नरके हरि (संपादक) म. फुले शोधाच्या नव्या वाटा, पृ. १५९..
७. कठारे अनिल ; फुले, शाहू, आंबेडकर, पृ. १५.
८. जोशी लक्ष्मणशास्त्री, १ली आवृत्ती प्रस्तावना, पृ. १९, महात्मा फुले समग्र वाङ्मय, फडके य. दि. (संपादक) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, ५ वी आवृत्ती, १९९१.
९. कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले, पृ. ५२.